CMYK

अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर

। सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ । 

## दुचाकीच्या धडकेन पादचारी वृद्ध ठार

**मंगळवेढा** : वेगाने जाणाऱ्या दुचाकीच्या धडकेने ७० वर्षीय पादचारी वृद्ध गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात मंगळवेढा ते उमदी रोडवरील बालेवाडी फाटा येथे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडला. संभाजी केरू फटे (वय ७०, रा.फटेवाडी ता. मंगळवेढा) असे मयताचे नाव आहे. ते शुक्रवारी सायंकाळी तळसंगी गावातील बालेवाडी फाटा येथून पायी निघाले होते. त्यावेळी एमएच१३डीएन- ६५१५ या दुचाकीच्या धडकेने ते गंभीर जखमी होऊन मयत झाले. मंगळवेढा पोलिसांनी दुचाकीचा चालक राहुल येडे राहणार (माळेवाडी ता.मंगळवेढा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार कोळी पुढील तपास करीत आहेत.

## सुळेवाडीत दगडाने मारहाण;चौघांवर गुन्हा

**माळशिरस** : घराकडे येणाऱ्या सांड पाण्याचा कारणावरून फायबर पाईप, दगड आणि हाताने केलेल्या मारहाणीत ५० वर्षीय इसम जखमी झाला. ही घटना सुळेवाडी (ता.माळशिरस) येथे शुक्रवारी सकाळी घडली. या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी एका महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. माधव केरप्पा खताळ (वय ५० रा. सुळेवाडी) असे जखमीचे नाव आहे. समाधान विजय खताळ, त्याचा भाऊ अजय खताळ, सुनिता खताळ आणि तुकाराम सुळे (सर्व रा.सुळेवाडी, ता.माळशिरस) या चौघावर गुन्हा झाला आहे. हवालदार सांगळे पुढील तपास करीत आहेत.

# धनगर आरक्षणप्रश्नी पंढरपुरात उपोषण

### आंदोलनातील ५ उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली
### एकाला आली चक्कर; उपचार घेण्यास नकार

**पंढरपूर/प्रतिनिधी**

धनगर समाजासाठी एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने पंढरपुरात राज्यव्यापी बेमुदत उपोषण आंदोलन सुरू आहे. त्यातील पाच उपोषणकर्त्यांची प्रकृती रविवारी ढासळली. त्यातील एकजण चक्कर येवून पडला.

आज सातव्या दिवशी सहा पैकी पाच उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडली.

यातील योगेश धरम हे चक्कर आल्याने जमिनीवर कोसळले, त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्यांयावर अतिदक्षता विभागात उपचार करण्यात येत आहेत. उर्वरीत चौघांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे.

आंदोलन करणाऱ्या उपोषणकर्त्यांच्या रक्तातील साखर कमी झाल्याने त्यांची प्रकृती खालावली आहे. सहा उपोषणकर्त्यांपैकी पाच जण अस्वस्थ झाले आहेत. त्यातील योगेश धरम यांना चक्कर आल्याने ते जमिनीवर कोसळले.

त्यांना पंढरपूरमधील खासगी दवाखान्यात अतिदक्षता विभागात उपचार करण्यात येत आहेत. इतर चार उपोषणकर्त्यांनी उपचार घेण्यास नकार कळविला आहे. ते उपोषण करण्यावर ठाम आहेत.

# कुरनूर येथे तरुणीची विष पिऊन आत्महत्या

**सोलापूर** : कुरनूर (ता अक्कलकोट ) येथे राहणाऱ्या एका १७ वर्षीय तरुणीने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्या केली . ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली. सृष्टी फुलचंद वचने (वय १७ रा. कुरनूर ता.अक्कलकोट) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. आज रविवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरात पिकावर फवारणीचे द्रव प्राशन केली होती. तिला बालाजी गवळी (मामा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. सृष्टी वचने ही कॉलेजमध्ये शिकत होती. तिचे आई-वडील वागदरी (ता. तुळजापूर) येथे राहतात. ती कुरुनुर येथे आजोळी राहण्यास होती . या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## सुरली येथे विष पिऊन आत्महत्या

सुरली (ता.माढा) येथे राहणाऱ्या हरिबा बाबुराव कदम (वय ४) याने विष पिऊन आत्महत्या केली. ३० ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास त्याने शेतात काम करताना करताना विषारी द्रव प्राशन केले होते . त्याला टेंभुर्णी येथे प्राथमिक उपचार करून पुष्पा (पत्नी) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो रविवारी पहाटे मयत झाला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

दहावी परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याच्या कारणावरून एका अल्पवयीन तरुणीने विष पिऊन आत्महत्याचा प्रयत्न केली. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील घरकुल परिसरात रविवारी दुपारच्या सुमारास घडली. तिने अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग प्राशन केली होती. तिला सोलापुरातील शासकीय रुग्णालय आईने दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.



## आंदोलन स्थळी उधळली गाजरं

पंढरपूर : धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी उपोषणाच्या सातच्या दिवशी एका उपोषणकर्त्याची प्रकृती खालावली. तरीही सरकारला भेटायला गेलेल्या शिष्टमंडळाला सरकारने समितीचे गाजर दाखवल्याने समाजाने आक्रमक होत आंदोलनस्थळीच सरकारचा निषेध करीत गाजराची उधळण केली. राज्य सरकारने समाजाला गाजर दाखविले आहे. आगामी निवडणुकीत आम्ही तुम्हाला केळी दाखवू असा निर्वाणीचा इशाराही दिला.











## मराठा समाजासह इतर समाजातील सर्व घटकांना सर्व प्रकारचे शिक्षण (शालेय, उच्च व व्यावसायिक) १०० टक्के मोफत करण्याची आमदार राजेंद्र राऊत यांची शासनाकडे आग्रही मागणी

महाराष्ट्र विधानसभा

**श्री. राजेंद्र विठ्ठल राऊत**
विधानसभा सदस्य,
बार्शी.

पत्ता - ३८०९, राऊत चाळ, अरणगांव रोड, बार्शी जि. सोलापूर ☎:(०२१८४) २२१८११, मो. ९८५०३३३३८८

जा.क्र. MLA/RR/१८५२/२०२४ दि. १३/०९/२०२४

प्रति,
मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

**विषय :- मुलांना व मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमासह सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ करणे व सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा मुलांसाठी व मुलींसाठी पूर्ण क्षमतेने वसतिगृह योजना सुरु करणे बाबत....**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये विनंती की, चालू वर्षी शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमासह सर्व उच्च शिक्षणास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ केले आहे. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन. तसेच वरील मराठा व इतर समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झालेली आहे. त्यांना मुलांचेही उच्च शिक्षण पूर्ण करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे समाजात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

तरी मुलींप्रमाणेच मुलांच्या शिक्षणाकरीता वरील मराठा व इतर समाजातील सर्वांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क १०० टक्के माफ करुन त्यांनाही उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी, तसेच सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तर व जिल्हास्तरावर देखील पूर्ण क्षमतेने स्वतंत्र वसतीगृह योजना सुरु करुन संपूर्ण महाराष्ट्रात मुलांना शालेय शिक्षण व उच्च शिक्षण विनामुल्य देण्याची सोय उपलब्ध करावी, ही विनंती.

आपला
(राजेंद्र विठ्ठल राऊत)

प्रत :-
१. मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. अजित (दादा) पवार साहेब, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. चंद्रकांत (दादा) पाटील साहेब, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, तथा, पालकमंत्री, सोलापूर,
४. मा. विजय वडेट्टीवार साहेब, विधानसभा विरोधी पक्ष नेते.
५. मा. अंबादास दानवे साहेब, विधान परिषद, विरोधी पक्ष नेते.

CMYK